॥श्री राम समर्थ॥
॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६), पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रँड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.



दैनिक सोलापूर

# कटूसत्य

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २०५ वा | शुक्रवार, दि. २० मार्च २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR



सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949


# गारपिटीचे भयंकर संकट! 7 जिल्हे संकटात, शेतकरी हवालदिल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील हवामानात मोठा बदल झाला असून काही भागात अवकाळी पाऊस सुरू आहे. यासोबतच आजही अवकाळी पावसासह गारपिटीचा मोठा इशारा देण्यात आला. मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात आज वादळी वाऱ्यासह पावसाचा आणि गारपिटीचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला.

यासोबतच राज्यातील इतर भागात आज पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला. नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, बीड,



छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी या भागात वादळी वाऱ्यासह जोरदार गारपिटीचा इशारा देण्यात आला असून ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला. पुढील काही तास या जिल्ह्यांसाठी अत्यंत धोकादायक असणार आहेत. काल राज्यातील अनेक भागात जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे वातावरणात

### बळीराजाची मागणी: पंचनामे तातडीने करा

निसर्गाच्या या अवकृपेमुळे सणासुदीच्या काळात शेतकरी वर्ग पूर्णपणे खचला आहे. "दिवस-रात्र कष्ट करून पिकवलेली पिके डोळ्यादेखत मातीमोल होताना पाहून आता जगायचे कसे?" असा सवाल शेतकरी विचारत आहेत. प्रशासनाने या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना तात्काळ मदत जाहीर करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

मोठा बदल झाला असून थंडगार हवामान झाले. त्यामध्येच आजही मोठा इशारा देण्यात आला.

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, आज राज्यात 40 ते 50 किलोमीटर वेगाने वारे वाहतील आणि मेघगर्जनेसह विजांच्या कडकडाटासोबत पाऊस हजेरी लावेल. छत्रपती संभाजीनगरमध्ये काल जोरदार अवकाळी पाऊस झाला. सिल्लोड तालुक्यात गारपीट, रब्बी पिक मोठ नुकसान होण्याची शक्यता. गहू, ज्वारी, बाजरीसह फळबागायती व भाजीपाला पिकाला मोठा फटका या अवकाळी पावसामुळे बसला आहे. सांगोला तालुक्यातील जुनोनी भागात पावसासह गारपीट झाल्याने मोठे नुकसान झाले. सोलापूर आणि सांगली जिल्ह्याच्या हद्दीवर गारपिटीचा मोठा पाऊस झाला. सुमारे दीड तासाहून अधिक काळ गारपिटीचा पाऊस सुरू होता. गारपिटीच्या पावसामुळे डाळिंबाचे मोठे नुकसान झाले. जत तालुक्यातील डफळापूर परिसरात अवकाळी पाऊस. सांगलीच्या जत तालुक्यातील डफळापूर येथे गारपीटाचा पाऊस झाला.

या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे नुकसान, द्राक्ष, गहू, ज्वारी, आंबा फळपिके यांचे नुकसान झाले आहे. जतच्या डफळापुर परिसरामध्ये सायंकाळच्या सुमारास अचानक ढग दाटून आले आणि अवकाळी पावसाला सुरुवात झाली. यावेळी काही ठिकाणी गारा ही पडल्या. राज्यात पुढील काही दिवस पावसाचे ढग कायम असणार आहेत. त्यामध्येच अनेक भागात मोठ्या प्रमाणात गारपिट होत असल्याने पिकांचे मोठे नुकसान होत आहे.


आरोग्यविषयक
मुळव्याध आहे?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450


# 'महाराष्ट्र विकायला काढलाय, राज्यभर ड्रग्स विकलं जातंय'

## राज ठाकरेंची सरकारवर टीका

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** मुंबईमधील शिवतीर्थ मैदानावर मनसेचा गुढीपाडवा मेळावा पार पडला आहे. या मेळाव्यात बोलताना मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी विविध विषयांवर भाष्य केलं. 'भविष्यात सत्ता हातात घेणार म्हणजे घेणार', असं म्हणत राज ठाकरे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली.

तसेच 'महाराष्ट्र विकायला काढलाय, राज्यभर ड्रग्स विकलं जातंय, भाषेची हमी नाही, मुलांची हमी नाही हे कोणतं राज्य?', असं म्हणत राज ठाकरे यांनी संताप व्यक्त केला आहे.



**राज ठाकरे काय म्हणाले?**

'मी अनेकदा काही व्हिडीओ पाहतो, आपलेच मराठी लोक ओरडून सांगत असतात हिंदी मत बोलो, तू काय करतोय? तू हे त्याला हिंदीतच सांगतो. तामिळनाडू, आंध्र प्रदेश बघा, केरळ बघा, गुजरात बघा. प्रत्येक राज्य आपलं अस्तित्व टिकवून आहे, आपली भाषा टिकवून आहे. पण आमच्याकडचे आमदार, खासदार हे फक्त कंत्राटदार अन पैसे एवढंच दररोज सुरू आहे. महाराष्ट्र विकायला काढलाय', असं राज ठाकरे यांनी म्हटलं.

'आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृहखातं आहे. पण संपूर्ण महाराष्ट्रभर ड्रग्स विकले जात आहेत. अनेक शाळांमध्ये, कॉलेजमध्ये ड्रग्स जातायेत. सगळे तरुण-तरुणी व्यसनाधीन होत आहेत. आपण महाराष्ट्राचं काय करणार आहोत? ग्रामीण भागात विकास होत नाही, ग्रामीण भागातील आमचे तरुण-तरुणी शहरांत येतात. पण इथं शहरं बकाल पडलेली आहेत. अनेक शहरांत ड्रग्स विकलं जातंय. लहान-लहान मुलं आणि मुली पळवले जात आहेत. माझ्याकडे काही आकडेवारी आहे. गेल्या नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये फक्त मुंबईमध्ये ८२ मुलं बेपत्ता झाले. जानेवारी ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत नवी मुंबईत तब्बल ४९९ अपहरणाच्या घटनांची नोंद झाली', असं म्हणत राज ठाकरेंनी सरकारवर टीका केली.

**'भविष्यात सत्ता हातात घेणार...', राज ठाकरेंचं मोठं वक्तव्य**

"आज आपल्या पक्षाला २० वर्ष पूर्ण झाले आहेत. आनंदाची गोष्ट म्हणजे आज २० वर्षानंतर १९ मार्चला गुढीपाडवा यावा, याला मी शुभसंकेतच मानतो. निवडणुका आल्या आणि गेल्या, सगळं झालं. मात्र, आपण जे उभे आहोत ते महाराष्ट्रासाठी उभे आहोत. मी आता जे बोलत आहे ते तुमच्या टाळ्या मिळाव्या म्हणून बोलत नाही. मी तुम्हाला जो शब्द दिला आहे, या महाराष्ट्राचं गतवैभव प्राप्त करण्यासाठी म्हणून आपल्याला जी सत्ता घ्यायची आहे, ती सत्ता भविष्यात आपण हाती घेणार म्हणजे घेणार, हा माझा आत्मविश्वास आहे", असं राज ठाकरे यांनी म्हटलं.

**'इन्स्टाग्राममधून बाहेर या..', राज ठाकरेंचं तरुणांना आवाहन**

"बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते की काय बोलतोस ते महत्त्वाचं नाही, तू आज त्यांना काय दिलंस ते महत्त्वाचं आहे. समोरच्यांना विचार करायला काय दिलंस? माझ्यावर दडपण असतं की नवीन काय देऊ तुम्हाला? हे सरकार विचार करायला लागेल. आज तुम्हाला, संपूर्ण देशाला करमणुकीत गुंतवून ठेवलं. आयपीएल सुरु आहे. कुठले कुठले पिक्चर येत आहेत. मी आज तुम्हाला नम्र विनंती करणार आहे, पहिल्यांदा मोबाइलच्या इन्स्टाग्राममधून (पान 2 वर..)

# पालकमंत्र्यांचा कार्यक्रम उधळण्याचा इशारा देणारे राम जाधव नजरकैदेत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा क्रांती मोचार्चे कार्यकर्ते राम जाधव यांनी पालकमंत्र्यांना काळे झेंडे दाखवत कार्यक्रम उधळण्याचा इशारा देत संयोजक माऊली पवार यांच्या विरोधातही तीव्र भूमिका घेतली. या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासन सतर्क झाले होते.

संभाव्य कायदा-सुव्यवस्था बिघडू नये म्हणून राम जाधव यांना त्यांच्या कार्यालयातच नजरकैदेत ठेवण्यात आले.

सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा समाजातील नगरसेवकांचा सत्कार सोहळा पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते आयोजित केला होता. मात्र, सोलापूरचे महापौरपद सर्वसाधारण प्रवगार्साठी असताना ते ओबीसी समाजाला दिल्यामुळे मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने अनेक दिवसांपासून आंदोलन केले जात आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे, भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांनी जबाबदार धरत आंदोलन केले जात आहे. त्यांचा एक भाग म्हणून पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत होणारा सत्कार सोहळा उधळून लावत काळे झेंडे दाखवण्याचा इशारा मराठा क्रांती मोर्चाचे राम जाधव यांनी दिला होता.





### माऊली पवारांच्या प्रतिमेला मारले जोडे

सत्कार सोहळ्यास सकल मराठा समाजाचा विरोध असतानाही कार्यक्रम घेण्यावर संयोजक ठाम असल्याने मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने संयोजक माऊली पवार यांच्या प्रतिमेस चार पुतळा परिसरात जोडे मार आंदोलन करण्यात आले. यावेळी समाजाचा गद्दार अशा घोषणा देण्यात आल्या.

### कार्यक्रमाकडे सत्कार मूर्तीची पाठ

कार्यक्रमावर वादाचे सावट असल्याने मराठा समाजातील श्रध्दा पवार, अमोल शिंदे, प्रियदर्शन साठे, जयकुमार माने, मनोरमा सपाटे, पूनम काशिद हे नगरसेवक गैरहजर राहिले. नूतन खासदार प्रा. ज्याती वाघमारे सत्कार मूर्ती असतानाही त्यांनी कार्यक्रमाकडे पाठ फिरवली.

त्यामुळे कार्यक्रमस्थळी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. कडक सुरक्षा व्यवस्थेत सत्कार सोहळा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला पालकमंत्री जयकुमार गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. मात्र, या कार्यक्रमात मराठा समाजातील तब्बल आठ नगरसेवकांनी अनुपस्थिती दर्शविल्याचे वास्तव समोर आले.


शिनगारे सिटी वासुद रोड अल्टिमेट जिमच्या समोर सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम
8275274353
डी.बी.शिंदे
9579421465




VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007


# माढा तालुक्यात गारपीट; द्राक्षे-आंबा पिकांचे मोठे नुकसान, शेतकरी हवालदिल

**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्यात गुरुवारी (ता. १९) सायंकाळी झालेल्या गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. विठ्ठलवाडी, उपळाई खुर्द, मोडनिंब यासह अनेक गावांमध्ये वादळी वाऱ्यासह विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटात गारपिट झाली.

या गारपिटीमुळे द्राक्षे, आंबा यांसारख्या बागवर्गीय पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरले आहे.

गुरुवारी सायंकाळी अचानक आलेल्या या हवामान बदलामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. द्राक्षबागांमध्ये द्राक्ष घडाचे नुकसान झाले आहे. आंब्याच्या झाडांवरील मोहोर व लहान फळेही गारपिटीमुळे झडली आहेत. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसणार असून आगामी हंगामातील उत्पादनावरही परिणाम होणार आहे.



माढा तालुक्यातील अनेक गावांमध्ये गारपिटीची तीव्रता जास्त होती. काही ठिकाणी विजांचा कडकडाट व वादळी वाऱ्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाईची मागणी केली आहे.

ग्रामीण भागात उन्हाळ्यात स्त्रिया शेवया, कुरड्या, पापड्या, लोणचं यांसारख्या घरगुती पदार्थांची तयारी करतात. या कामासाठी लागणारे सूर्यप्रकाश, उष्णता आणि हवामानातील स्थिरता अत्यंत महत्त्वाची असते. मात्र अचानक झालेल्या गारपिटीमुळे वातावरण ओलसर झाले असून या पदार्थांच्या वाळवणीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे महिलांच्या मेहनतीवर पाणी फिरले असून घरगुती उद्योगातून मिळणाऱ्या उत्पन्नावरही फटका बसणार आहे.

उन्हाळ्यामुळे त्रस्त नागरिकांना मात्र या गारपिटीने वातावरणात गारवा निर्माण झाल्याने दिलासा मिळाला.

# जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये स्वीकृत सदस्यांच्या प्रवेशाला मंजुरी

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रातील महानगरपालिका आणि नगरपालिकांप्रमाणेच, आता जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांमध्ये 'स्वीकृत सदस्यां'च्या नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे. यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती विधेयक मंगळवारी विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले.

हे विधेयक कायद्यात रूपांतरित झाल्यानंतर जिल्हा परिषदांमध्ये २०१ नवीन सदस्यांची वाढ होईल. तर पंचायत समित्यांमध्ये ८०४ जणांना नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्त करण्याचा मार्ग मोकळा होईल.

ग्रामीण विकास प्रक्रियेत सामाजिक क्षेत्रातील आणि विविध तांत्रिक शाखांमधील तज्ञांच्या अनुभवाचा उपयोग प्रशासनाला करता यावा, हे सुनिश्चित करण्यासाठी राज्य सरकारने हे पाऊल उचलले आहे. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी हे विधेयक सभागृहात





चर्चेसाठी सादर केले. विधेयकाच्या तरतुदींनुसार, जिल्हा परिषदेसाठी एकूण निर्वाचित सदस्यांपैकी १० टक्के, म्हणजेच किमान पाच सदस्यांना मंजुरी दिली जाईल. त्याचप्रमाणे पंचायत समितीसाठी एकूण निर्वाचित सदस्यांपैकी २० टक्के, म्हणजेच किमान एका सदस्याला मंजुरी देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

परिणामी महाराष्ट्राच्या ३४ जिल्हा परिषदांमध्ये आता २०१ मंजूर सदस्य आणि २,०१२ निर्वाचित सदस्य असतील. ३०१ पंचायत समित्यांमध्ये ४,०२४ सदस्य असतील, ज्यात ८०४ नामनिर्देशित सदस्य असतील. या मंजूर सदस्यांना प्रशासकीय बाबींवर सल्ला आणि तांत्रिक मार्गदर्शन करण्याचा अधिकार असेल. परंतु त्यांचे राजकीय अधिकार मर्यादित असतील. त्यांना कोणत्याही प्रस्तावावर मतदान करण्याचा अधिकार नसेल.

ते अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती किंवा उपसभापती यांसारख्या पदांसाठी पात्र नसतील. त्यांचा कार्यकाळ संबंधित परिषद किंवा समितीच्या कार्यकाळासोबतच असेल. विधेयकावरील चर्चेदरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार) अभिजीत पाटील, भाजपचे विक्रम पाचपुते आणि हरीश पिंपळे, काँग्रेसचे नाना पटोले, शिवसेनेचे सुहास बाबर आणि प्रतापराव पाटील-चिखलिकर, तसेच शेकपचे बाबासाहेब देशमुख यांसारख्या विविध पक्षांच्या नेत्यांनी आपली मते व्यक्त केली.

विधेयकाचे स्वागत करण्यासोबतच त्यांनी ग्रामपंचायतींमध्ये अशा नामनिर्देशित सदस्यांच्या नियुक्तीची मागणीही केली. या सदस्यांची नियुक्ती जिल्हाधिकाऱ्यांमार्फत केली जाईल. नियुक्तीसाठी संबंधित सभागृहातील राजकीय पक्षांचे संख्याबळ हा आधार मानला जाईल. पक्षनेत्यांशी चर्चा केल्यानंतर जागांचे प्रमाणशीर वाटप केले जाईल. नियुक्त सदस्यांची नावे राज्य निवडणूक आयोगामार्फत राजपत्रात प्रसिद्ध केली जातील.

# शेतकऱ्यांच्या बांधावर तहसीलदार

## मंगळवेढ्यात 'एक दिवस बळीराजासाठी' उपक्रम चर्चेत

**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** एक दिवस बळीराजासाठी या उपक्रमांतर्गत मंगळवार आणि गुरुवारी तहसीलदार मदन जाधव हे शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत जाऊन महसूल विषयक असलेले प्रश्न समजून घेत असल्यामुळे गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या महसूलच्या समस्या यामुळे सुटू लागल्याने महसूल प्रशासन सध्या तालुक्यात चर्चेचा विषय ठरला.

शहर व ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक शेतकरी व महिला, निराधार व्यक्तीचा सर्वात जास्त संपर्क तहसील कार्यालयास येत



असतो. त्यामध्ये वयोवृद्ध, भूमीहीन तसेच निराधार महिलांसाठी संजय गांधी योजनेचा लाभ, शिधापत्रिका व धान्यासाठी पुरवठा विभाग, नक्कल विभाग, (पान 2 वर..)

# युद्धामुळे केळी निर्यातीवर परिणाम - खा मोहिते पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** इराण-इस्त्राईल-अमेरिका युद्धामुळे केळी नियार्तीवर परिणाम होऊन केळीसह इतर फळे भाजीपाला यांचे दर कोसळले आहेत. केळीचा दर १८ ते २३ रूपयावरून ८ ते १० रूपयांवर आला आहे. आखाती देशात जाणारे केळीचे ४०० कंन्टेनर बंदरांच्या ठिकाणी अडकले आहेत. फळपिकांच्या बाजारभावात सरकारने हस्तक्षेप करण्याबरोबरच निर्यात सुरळीत करण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात लोकसभेत कृषी विभागाच्या मागण्यांवर बोलताना केली.

**देशातील ५० टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या शेतीवर अवलंबून असताना देशातील**

शेतकरी आज गंभीर संकटात आहे. उत्पादन खर्च वाढतोय, पण उत्पन्न नाही. योग्य दर न मिळाल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत चालला आहे. हमीभाव केवळ कागदावर राहिला आहे. शेतीसाठीचे सिंचन प्रकल्प अपूर्ण आहेत, त्यामुळे शेती. अजूनही पावसावर अवलंबून आहे. अर्थसंकल्पातील शेतकऱ्यांसाठीच्या तरतुदी पाहिल्या की वाटते शेती हा सरकारसाठी दुय्यम विषय आहे.

सरकारी धोरणांमुळे शेतकऱ्यांची स्वप्ने पूर्ण होत नाहीत. सरकार बोलते एक आणि जमिनीवर घडते काहीतरी वेगळेच. अर्थसंकल्प पाहिला की लक्षात येते, शेतकऱ्यांना अजूनही प्राधान्यक्रम नाही. २०२६-२७ सालातील अर्थसंकल्पात कृषी विभागासाठीची तरतूद 1 लाख 30 हजार कोटी इतकी आहे.ही वाढ केवळ कागदावर दिसते.महागाई



वाढली आहे. खत बियाण्यांचे दर वाढले,इंधन दर वाढले,मात्र सरकार शेतकऱ्यांना कुठलीच मदत करत नाही.हा शेतकऱ्यांवर अन्याय नाही का? असा सवाल खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी उपस्थित केला. तर माढा लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या करमाळा व आसपासच्या तालुक्यात मोठ्या प्रमाणात केळी लागवड केली जाते. निर्यातक्षम केळी उत्पादनातून 20 हजार कोटीचे उलाढाल होते. केळीवर शेतकरी मजूर कोल्ड स्टोरेजस अवलंबून आहेत. पंधरा हजार केळी कंटेनर गत वर्षी सोलापूर जिल्ह्यातून निर्यात झाले होते. करमाळा तालुक्यात केळी संशोधन केंद्र सुरू करण्याचे आग्रही मागणी यावेळी खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी केली.

## संपादकीय

# सत्ताधाऱ्यांची धांदल कशामुळे?

लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरोधातील अविश्वास प्रस्ताव संमत होणार नाही हे स्पष्टच होते. त्यामुळे सत्ताधारी 'एनडीए' आघाडी निश्चिंत होती. या प्रस्तावाकडे लक्ष देण्याची जबाबदारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी घेतलेली होती. संपूर्ण चर्चेला शहा सभागृहात उपस्थित होते. चर्चेच्या पहिल्या दिवशी पीठासीन अधिकारी जगदम्बिका पाल यांनाच जास्त बोलायचे असल्याने आणि भाजपशी आपण किती एकनिष्ठ आहोत हे दाखवायचे असल्यामुळे वेळ खरे तर वाया गेला. काँग्रेसच्या गौरव गोगोईंना अडवण्यात आणि सल्ला देण्यात पाल यांना अधिक रुची असल्याचे दिसले. तोपर्यंत केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीची वेळ झाली होती. मग, संदेश पाठवण्यात आला आणि लगेच सभागृहाचे कामकाज तहकूब झाले. शहांना मंत्रिमंडळाच्या बैठकीला जायचे असल्याने कदाचित असे झाले असावे. या प्रस्तावाला शहा उत्तर देणार असल्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सभागृहात उपस्थित राहण्याची गरज नव्हती. त्यांना उत्तरही द्यायचे नव्हते. एरवीही मोदी सभागृहातील चर्चांना क्वचितच उपस्थित राहतात. अविश्वास प्रस्तावाच्या चर्चेत त्यांचा सहभाग नव्हता. मोदी निवडणूकपूर्व प्रचारामध्ये गुंतलेले होते. तमिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम या विधानसभा निवडणुका होणाऱ्या राज्यांमध्ये त्यांचे दौरे होते. त्यामुळे लोकसभेतील चर्चा त्यांनी किती ऐकली असेल हे माहीत नाही. मोदींना तसेच बिर्ला यांना चिंता करण्याजोगे काहीही नव्हते. त्यामुळे हा प्रस्ताव आला, तो नामंजूर झाला आणि लोकसभेतील पुढील कामकाज सुरू झाले. तिथे मात्र केंद्र सरकारची कोंडी झाली.

खरे तर विरोधकांनी एलपीजी गॅसचा तुटवडा, इंधनपुरवठ्यातील समस्या या दोन मुद्द्यांवर चर्चा करायची होती. पहिल्या दिवशी विरोधकांनी सत्ताधार्यांना घेरलेही होते, पण हा मुद्दा अचानक विरोधकांनी सोडून देऊन बिर्लांविरोधातील अविश्वास प्रस्तावाला प्राधान्य दिले आणि चर्चेत भाग घेतला. केंद्र सरकारलाही 'एलपीजी'वरील चर्चा पुढे ढकलणे बरेच होते. अविश्वास प्रस्तावावर कोणीही कितीही टीका केली तरी त्यातून काही साध्य होणारे नव्हते, पण एलपीजी वगैरे मुद्दे अडचणीचे ठरतात. झालेही तसेच. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र पाठवून एलपीजी-इंधनपुरवठा वगैरे मुद्दे सभागृहात उपस्थित करण्याची परवानगी मागितली. बिर्लांनी राहुल गांधींना सभागृहात बोलण्याची परवानगी दिली. सभागृहात विशेष महत्त्वाचा मुद्दा उपस्थित करता येतो. राहुल गांधींना मुद्दा मांडता येणार होता, कोणी हस्तक्षेप करण्याचे कारण नव्हते. राहुल गांधी पेट्रोलियमविषयक मुद्दा मांडणार असल्याने केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप पुरी यांना सभागृहात उपस्थित राहावे लागले. त्यांनी निवेदन दिले. पण त्याआधीच राहुल गांधींनी एलपीजी वगैरे मुद्दा मांडताना एपस्टीन फाइल्सचा जाणूनबुजून उल्लेख केला. हा जेफ्री एपस्टीन अव्वल दर्जाचा दलाल होता. त्याच्या अनेक भानगडी होत्या. त्यासंदभार्तील फाइल्समध्ये हरदीप पुरी यांच्या नावाचा उल्लेख झालेला आहे. त्यामुळे हे पुरी वादात सापडले आहेत. त्यांना केंद्र सरकारने अभय दिलेले आहे. या पुरींनी राजीनामा दिला पाहिजे असे विरोधकांचे म्हणणे आहे. राहुल गांधींनी एपस्टीन फाइल्सचा उल्लेख करताच त्यांना बिर्लांनी थांबवले. तुम्ही ज्या विषयावर बोलणार होतात तो हा विषय नाही. एपस्टीन फाइल्सचा आणि एलपीजी गॅसचा तुटवडा, इंधनपुरवठा वगैरे मुद्द्यांशी संबंध काय, असा प्रश्न बिर्लांनी केला. राहुल गांधी म्हणत होते की, या सगळ्याशी संबंध आहे म्हणून बोलतो आहे, पण बिर्लांनी ऐकले नाही. तातडीने सभागृहाचे कामकाज तहकूब केले. दोन दिवस अविश्वास प्रस्तावावर चर्चा करताना कसलीही चिंता न बाळगणारे सत्ताधारी 'एपस्टीन फाइल्स' असा उल्लेख ऐकल्यावर अस्वस्थ झाले. बिर्लांनीही तातडीने आक्षेप घेतला. राहुल गांधींचे बोलणे रोखण्यात आले. 'एपस्टीन' या एका शब्दाने सत्ताधारी, केंद्र सरकार, लोकसभाध्यक्ष असे सगळेच एकाचवेळी हडबडून गेले. राहुल गांधी लोकसभेतून बाहेर पडले आणि काँग्रेस कार्यकर्त्यांच्या कार्यक्रमात सहभागी झाले. तिथे ते म्हणाले की, एपस्टीन हे नाव जरी ऐकले तरी सत्ताधाऱ्यांची तारांबळ उडते. माझे बोलणे थांबवले जाते. त्यांना या शब्दाची भीती वाटते- राहुल गांधींनी या कार्यक्रमातील भाषणातून 'एपस्टीन' ही सत्ताधाऱ्यांची दुखरी नस असल्याचा एकप्रकारे दावा केला. एपस्टीन या शब्दामुळे सत्ताधारी इतके अस्वस्थ का होतात, असा त्यांचा प्रश्न होता.

\वास्तविक, राहुल गांधींनी 'एपस्टीन' शब्दाचा उल्लेख करून आरोपांची मोठी साखळी उभी केली असे दिसते. त्यातून केंद्र सरकार आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये अडचणीत आल्याचे दाखवण्याचा प्रयत्न राहुल गांधींनी केला आहे. पंतप्रधान 'कॉम्प्रोमाइज्ड' झालेले आहेत, असा आरोप काँग्रेसने वारंवार प्रचारात केला आहे. पंतप्रधान 'कॉम्प्रोमाइज्ड' झाले असतील तर त्यांच्यावर सर्वप्रकारचा आंतरराष्ट्रीय दबाव येणार. या दबावासमोर झुकण्याशिवाय पर्याय उरणार नाही. तसे झाले तर देशाचे हित कसे सांभाळले जाऊ शकेल, असे काँग्रेसचे म्हणणे आहे. पंतप्रधान 'कॉम्प्रोमाइज्ड' झाले असतील तर ते एपस्टीन फाइल्समुळे असू शकेल. आधीच देशातील एका केंद्रीय मंत्र्यांचा आणि एका मोठ्या उद्योजकाचा उल्लेख झालेला आहे. एपस्टीन फाइल्समधील आणखी काही लाख फाइल्स सार्वजनिक व्हायच्या आहेत. अमेरिकेने या फाइल्सच्या आधारे केंद्र सरकारवर सर्व प्रकाराचा दबाव आणला आहे, असा युक्तिवाद काँग्रेसच्या नेत्यांकडून केला जातो. एपस्टीन फाइल्सवरून लोकसभेत विरोधकांनी घोषणाबाजी केली होती. त्याचा अर्थ विरोधकांनी एपस्टीन फाइल्सचा संबंध केंद्र सरकारच्या आंतरराष्ट्रीय धोरण-निश्चितीशी असल्याचाही आरोप केलेला आहे.

### सारेत्या 'फाइल्स'मुळेच?

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर दबाव का आणला? अतिरिक्त आयातकर इतर देशांवरही लादले गेले हे खरे; पण ट्रम्प यांनी वारंवार भारताला लक्ष्य केले तसे इतर देशांना केलेले नाही. ट्रम्प सातत्याने भारत-पाकिस्तान युद्ध त्यांच्या मध्यस्थीने थांबल्याचे सांगत आहेत. या युद्धाचा संबंध त्यांनी भारताच्या व्यापाराशी जोडला होता. भारताला अमेरिकेचे म्हणणे मान्य करून, रशियाकडून कच्च्या तेलाची खरेदी कमी करावी लागली. अमेरिकेने 'परवानगी' दिली म्हणून आता संकटकाळात भारताने रशियाकडून कच्चे तेल पुन्हा घेतले. ट्रम्प भारताच्या आकांक्षा धुळीला मिळवत असताना केंद्र सरकार निमूट ऐकून घेत आहे. त्याचे कारण एपस्टीन फाइल्स हेच असल्याचा दावा काँग्रेसने केला आहे. अमेरिका-इस्रायलच्या इराणविरोधी युद्धामध्ये भारताने अमेरिकेची बाजू घेतल्याचे चित्र निर्माण झाले.

इराणशी भारताचे पारंपरिक संबंध होते, इराणकडून भारत कच्चे तेल विकत घेतो. इस्रायल-पॅलस्टिन संघर्ष वा इराण-अमेरिका संघर्ष असो, भारत आत्तापर्यंत तटस्थ राहिला. या वेळी मात्र भारताने अमेरिकेची बाजू घेतली. त्यामुळे भारत इराणविरोधात असल्याचे मानले गेले. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी इस्रायलच्या हल्ल्यात ठार झाल्यानंतर त्याबद्दल भारताने शोकही व्यक्त केला नाही. या घटनेच्या सहा दिवसांनंतर भारताकडून इराणच्या दूतावासात शोकसंदेश लिहिला गेला. या पक्षपाती भूमिकेचा फटका भारताला इंधनपुरवठ्याच्या राजकारणात बसला. एलपीजीचा तुटवडा वाढला, त्याचे परिणाम देशभर दिसू लागले. देशात रोष वाढण्याची चिन्हे दिसू लागली. तेव्हा मात्र भारताने इराणशी संवाद सुरू केला, ताणलेले संबंध पूर्ववत करण्याचा प्रयत्न केला गेला. एपस्टीन फाइल्स नसत्या तर केंद्र सरकार अशा कुठल्याही विषयावर दबावाखाली आले नसते, भारताला आंतरराष्ट्रीय धोरणामध्ये तडजोडच करावी लागली नसती.

तसे झाले नसते तर इराणने भारताच्या इंधननौका मुळात अडवल्याच नसत्या. रशिया व चीन यांची इंधनपुरवठा जहाजे इराणने जाऊ दिली. भारताला मात्र तारेवरची कसरत करावी लागली, असा युक्तिवाद काँग्रेसने केला. एपस्टीन फाइल्सचा उल्लेख राहुल गांधींनी एलपीजी आणि इंधनाच्या मुद्द्यावर करण्यामागील हेच कारण असल्याचे दिसते. राहुल गांधी यांनी एपस्टीन एवढाच शब्द उच्चारला होता. बिर्ला म्हणत होते की, एलपीजीच्या विषयाशी एपस्टीनचा संबंध काय आणि संदभार्बाहेरचे मुद्दे का मांडले जात आहेत. पण राहुल गांधी यांनी एपस्टीन या एका शब्दामधून सगळे धागे उलगडून दाखवले. राहुल गांधींना नेमके काय म्हणायचे आहे आणि ते काय सिद्ध करण्याचा प्रयत्न करत आहेत हे केंद्र सरकारमधील चाणाक्षांनी ओळखले नसेल असे मानणे चुकीचे ठरेल. म्हणूनच एपस्टीन हा शब्द केंद्र सत्तार्धायांसाठी घातक ठरू लागला आहे. त्यातूनच त्यांची धांदल होऊ लागल्याचे दिसते.

# महाड चवदार तळे सत्याग्रह : समतेच्या हक्कासाठीची जलक्रांती

भारतीय समाजाच्या इतिहासात काही घटना अशा आहेत की ज्यांनी केवळ एका प्रश्नाचे निराकरण केले नाही, तर संपूर्ण सामाजिक व्यवस्थेच्या पाया हलवून टाकला. २० मार्च १९२७ रोजी घडलेला महाड चवदार तळे सत्याग्रह हा असा एक ऐतिहासिक टप्पा आहे, ज्याने भारतीय समाजातील अस्पृश्यतेच्या अमानुष प्रथेला उघडपणे आव्हान दिले आणि समानतेच्या लढ्याला एक नवीन दिशा दिली. हा सत्याग्रह पाण्यासारख्या मूलभूत हक्कासाठी होता, परंतु त्यामागे असलेली भावना ही मानवी सन्मान, स्वाभिमान आणि न्याय यांची होती. त्यामुळेच हा प्रसंग भारतीय सामाजिक क्रांतीच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

ब्रिटिशकालीन भारतात जातिव्यवस्था अत्यंत कठोर स्वरूपात अस्तित्वात होती. समाजातील तथाकथित उच्चवर्णीयांनी स्वतःला श्रेष्ठ समजत खालच्या जातींना सर्व प्रकारच्या मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवले होते. अस्पृश्य मानल्या गेलेल्या लोकांना सार्वजनिक ठिकाणी जाण्याची, विहिरी किंवा तलावाचे पाणी वापरण्याची, शाळांमध्ये शिक्षण घेण्याची किंवा मंदिरात प्रवेश करण्याची परवानगी नव्हती. पाणी ही जरी सर्वांसाठी समान असणारी नैसर्गिक संपत्ती असली तरीही त्या काळात त्यावरही जातीय बंधने घालण्यात आली होती. त्यामुळे पाण्याचा प्रश्न हा केवळ जीवनावश्यक गरजेचा प्रश्न नव्हता, तर तो सामाजिक प्रतिष्ठेचा आणि मानवी अस्तित्वाचा प्रश्न होता.

याच अन्यायकारक परिस्थितीविरुद्ध आवाज उठवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुढाकार घेतला. त्यांनी अस्पृश्य समाजातील लोकांना शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीच्या माध्यमातून आपल्या हक्कांसाठी लढण्याचे आवाहन केले. त्यांच्या नेतृत्वाखाली समाजातील वंचित घटकांनी स्वतःच्या हक्कांसाठी उभे राहण्याचा निर्धार केला. महाड येथे असलेले चवदार तळे हे सार्वजनिक जलस्रोत असूनही अस्पृश्यांना त्याचा वापर करण्यास मनाई होती. १९२४ मध्ये महाड नगरपालिकेने सर्वांना या तळ्याचे पाणी वापरण्याचा अधिकार देणारा ठराव मंजूर केला होता, परंतु प्रत्यक्षात हा ठराव अंमलात आणला गेला नाही.

या पार्श्वभूमीवर १९ आणि २० मार्च १९२७रोजी महाड येथे एक ऐतिहासिक परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेला हजारो बहिष्कृत बांधव उपस्थित होते. या परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले भाषण अत्यंत प्रभावी होते. त्यांनी उपस्थितांना आत्मसन्मानाची जाणीव करून दिली आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा दिली. त्यांनी स्पष्ट केले की, 'आपण माणूस आहोत आणि माणूस म्हणून जगण्याचा आपला पूर्ण हक्क आहे.' त्यांच्या या विचारांनी उपस्थितांमध्ये प्रचंड





उत्साह निर्माण झाला.

२० मार्च १९२७ रोजी हजारो लोकांनी एकत्र येऊन चवदार तळ्याकडे मोर्चा काढला. त्यांनी तळ्याचे पाणी प्राशन करून आपल्या हक्काची घोषणा केली. हा प्रसंग भारतीय सामाजिक इतिहासातील एक क्रांतिकारी क्षण होता.

या कृतीमुळे अस्पृश्य समाजाने आपल्या हक्कांसाठी प्रत्यक्ष कृती केली आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य दाखवले. हा सत्याग्रह म्हणजे केवळ एक आंदोलन नव्हते, तर तो सामाजिक परिवर्तनाचा प्रारंभ होता.

या घटनेनंतर समाजातील उच्चवर्णीय घटकांनी तीव्र विरोध दर्शवला. त्यांनी या कृतीचा निषेध केला आणि तळ्याचे 'शुद्धीकरण' करण्याचा प्रयत्न केला. या कृतीतून त्या काळातील सामाजिक मानसिकतेचे वास्तव स्पष्ट होते. तथापि, या विरोधामुळे चळवळीची तीव्रता कमी झाली नाही. उलट या घटनेने अस्पृश्य समाजात आत्मविश्वास वाढवला आणि त्यांनी आपल्या हक्कांसाठी लढण्याचा निर्धार अधिक दृढ केला.

महाड चवदार तळे सत्याग्रहाचे महत्त्व केवळ त्या काळापुरते मर्यादित नाही. या आंदोलनाने भारतीय समाजात समतेच्या विचारांना चालना दिली. या चळवळीच्या पुढील टप्प्यात २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृतीचे दहन करण्यात आले, ज्यामुळे सामाजिक विषमतेच्या विचारसरणीविरुद्ध एक ठोस संदेश दिला गेला. या घटनांनी भारतीय समाजात परिवर्तनाची प्रक्रिया सुरू केली आणि सामाजिक न्यायाच्या चळवळीला बळ मिळाले.

महाड सत्याग्रह हा भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. कारण या चळवळीने केवळ राजकीय स्वातंत्र्याची मागणी केली नाही, तर सामाजिक स्वातंत्र्याचीही गरज अधोरेखित केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्पष्ट केले की, 'राजकीय स्वातंत्र्याला काही अर्थ नाही, जर समाजात समानता आणि न्याय नसेल. 'त्यांच्या या विचारांचा प्रभाव पुढे भारतीय संविधानाच्या निर्मितीत दिसून येतो.

महाड चवदार तळे सत्याग्रहाने समाजातील वंचित घटकांमध्ये आत्मसन्मानाची भावना निर्माण केली. त्यांनी स्वतःला हीन समजण्याऐवजी स्वाभिमानाने जगण्याचा निर्धार केला. शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक परिवर्तनासाठी प्रयत्न सुरू केले. या चळवळीने समाजातील इतर घटकांनाही विचार करण्यास भाग पाडले.

आजच्या काळातही महाड सत्याग्रहाची प्रासंगिकता तितकीच आहे. जरी कायद्याने अस्पृश्यता नष्ट केली असली तरी सामाजिक पातळीवर अजूनही भेदभावाच्या घटना घडतात. त्यामुळे या ऐतिहासिक घटनेचे स्मरण करून आपण सामाजिक समतेसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. शिक्षण, जागरूकता आणि सामाजिक बांधिलकी यांच्या माध्यमातून आपण हा लढा पुढे नेऊ शकतो.

महाड चवदार तळे सत्याग्रह हा केवळ एक ऐतिहासिक प्रसंग नाही, तर तो मानवी हक्कांसाठीच्या संघर्षाची प्रेरणादायी कथा आहे. या आंदोलनाने आपल्याला शिकवले की, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक घटकाला समान हक्क मिळवून देण्यासाठी सतत प्रयत्न करणे हीच खरी मानवता आहे.

आज, २० मार्च या ऐतिहासिक क्रांती दिनानिमित्त आपण महाड चवदार तळे सत्याग्रह या घटनेचे स्मरण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कायार्ला अभिवादन करतो. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन आपण समतेच्या, न्यायाच्या आणि बंधुत्वाच्या मूल्यांचे पालन करणे आवश्यक आहे.

महाडचा हा सत्याग्रह भारतीय सामाजिक क्रांतीचा दीपस्तंभ आहे. त्याने आपल्याला दाखवून दिले की, बदल घडवून आणण्यासाठी धैर्य, संघटन आणि नेतृत्व आवश्यक असते. या घटनेचे स्मरण म्हणजे केवळ इतिहासाचे पुनरावलोकन नाही, तर भविष्यासाठी मार्गदर्शन आहे. चला, या ऐतिहासिक दिवसाचे औचित्य साधून आपण सर्वजण सामाजिक समतेसाठी कटिबद्ध होऊया आणि एक न्याय्य, समतावादी समाज निर्माण करूया.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),
bagate.rajendra5@gmail.com

# राज्यपालांच्या हस्ते लोकभवनात इतिहास व अभिलेख दालनाचे उद्घाटन

## दालनात १५० वर्षांमधील निवडक छायाचित्रे व दस्तावेजांचे प्रदर्शन

**मुंबई :** महाराष्ट्र लोकभवन येथे गेल्या १५० वर्षात घडलेल्या निवडक ऐतिहासिक घटना, राष्ट्रीय अतिथींच्या गाठीभेटी तसेच महत्वाच्या दस्तावेजांचे छायाचित्ररूपी संकलन असलेल्या 'राज्यपाल दालनाचे' उद्घाटन महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते गुरुवारी (दि. १९ मार्च) लोकभवन मुंबई येथे करण्यात आले. राज्यपालांनी इतिहास व अभिलेखाच्या दालनाचे कौतुक केले व दालनाच्या माध्यमातून अधिकाधिक दस्तावेज पुढे आणण्याची सूचना केली.

राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे व जनसंपर्क अधिकारी उमेश काशीकर यांनी राज्यपालांना दालनात लावण्यात आलेल्या छायाचित्रे व दस्तावेजांची माहिती दिली.

दिनांक १४ जून २०२२ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकभवनातील ब्रिटिशकालीन बंकरमध्ये क्रांतिकारकांच्या दालनाचे उद्घाटन करण्यात आले होते. याच बंकरमध्ये इतिहास व दस्तावेज छायाचित्र रूपाने दाखवणारे नवे 'राज्यपाल दालन' तयार करण्यात आले आहे. आता, लोकभवनच्या संकेत स्थळावर नोंदणी करुन लोकभवन पाहण्यास येणाऱ्या अभ्यागतांना हे दालन पाहता येणार आहे.





### असे आहे 'राज्यपालांचे इतिहास व अभिलेख दालन'

लोकभवन या जागी स्वातंत्र्यपूर्व काळात मुंबई प्रांताचे 'गव्हर्मेंट हाऊस' होते. सन १९५० साली भारत प्रजासत्ताक झाल्यानंतर 'गव्हर्मेंट हाऊस' हे मुंबई प्रांताचे राजभवन झाले. दिनांक १ मे १९६० रोजी राज्यनिर्मितीनंतर ते महाराष्ट्राचे राजभवन झाले. अलीकडेच, दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ रोजी राजभवनाचे नाव 'लोकभवन' करण्यात आले. या सर्व स्थित्यंतरांमधील निवडक प्रसंगांची छायाचित्रे व दस्तावेजांचे पॅनेल्स दालनात ठेवण्यात आले आहे.

व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन यांची 'गव्हर्मेंट हाऊस' येथे भेट (१८९८), प्रिन्स ऑफ वेल्स जॉर्ज यांची 'गव्हर्मेंट हाऊस' येथे भेट (१९०५); महात्मा गांधी यांच्या 'गव्हर्मेंट हाऊस' येथे झालेल्या तीन भेटी (१९१५, १९३१); देशाच्या पहिल्या स्वातंत्र्य दिनी 'गॉड सेव्ह द किंग' न म्हणता 'वंदे मातरम' गाण्याच्या सूचना असलेले शासनाचे परिपत्रक (१९४७); महात्मा गांधी यांच्या हत्येनंतर राज्यपालांनी व्हाइसरॉय लॉर्ड माऊंटबॅटन यांना पाठवलेला शोकसंदेश (१९४८), शासकीय कार्यालयातील जॉर्ज सहावे यांचे छायाचित्र भिंतीवरून काढून त्या ऐवजी महात्मा गांधी यांचे छायाचित्र लावण्याचा शासकीय आदेश (१९४९); सरदार वल्लभभाई पटेल यांच्या निधनानंतर राज्यपालांनी त्यांचे पुत्र डाह्याभाई पटेल यांना पाठवलेले भावपूर्ण पत्र (१९५०); राणी एलिझाबेथ द्वितीय यांच्या सन्मानार्थ राजभवन येथे आयोजित 'फॅशन परेड' ची छायाचित्रे (१९६१); चांद्रवीर नील आर्मस्ट्रॉंग (१९६९) यांच्या राजभवन येथे झालेल्या स्वागत समारोहाची छायाचित्रे (१९६९) तसेच सन २०११ साली विश्वचषक विजेत्या भारतीय क्रिकेट संघासाठी राष्ट्रपतींच्या उपस्थितीत राजभवन येथे झालेल्या स्वागत समारंभाची छायाचित्रे या विषयांवरील पॅनेल्स दालनात लावण्यात आले आहेत.

राज्यपाल दालनाच्या उद्घाटन प्रसंगी राज्यपालांचे सहसचिव एस. राममूर्ती, राज्यपालांचे परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे, पुणे येथील कर्वे इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सर्व्हिसचे संचालक महेश ठाकूर तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जनसंपर्क अधिकारी उमेश काशीकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या दालनातील छायाचित्रांची मांडणी व सजावट निधी बोलार यांची आहे; तर कर्वे इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसचे या प्रकल्पाला सहकार्य लाभले आहे.

# कर्तव्यपथावर झळकलेल्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा मुंबईकरांना प्रत्यक्ष अनुभव




**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** नवी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त कर्तव्यपथावर पार पडलेल्या भव्य संचलनात प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या महाराष्ट्र राज्याच्या चित्ररथाचे गिरगाव, मुंबई येथे नागरिकांसाठी प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे दर्शन सर्वसामान्यांना घडत असून नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

महाराष्ट्राच्या लोकसंस्कृती, संत परंपरा, कला आणि परंपरागत वैभवाचे प्रभावी दर्शन घडविणाऱ्या या चित्ररथाने राष्ट्रीय पातळीवर विशेष छाप पाडत देशभरातील प्रेक्षकांची मने जिंकली होती. विविध सांस्कृतिक घटकांचे सजीव आणि आकर्षक सादरीकरण या चित्ररथातून करण्यात आले असून, राज्याच्या वैभवशाली वारशाचे दर्शन घडविणारा हा उपक्रम ठरला आहे.

या चित्ररथाच्या साकार प्रक्रियेत विविध कलाकार, तंत्रज्ञ आणि सांस्कृतिक क्षेत्रातील जाणकारांनी योगदान दिले असून त्यांच्या सर्जनशीलतेचा उत्कृष्ट आविष्कार या माध्यमातून पाहायला मिळतो. प्रजासत्ताक दिन संचलनात मिळालेल्या यशामुळे राज्याच्या सांस्कृतिक ओळखीला राष्ट्रीय स्तरावर नवे महत्त्व प्राप्त झाले आहे.

सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आयोजित हा कार्यक्रम महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडत आहे.

गिरगाव परिसरातील या प्रदर्शनाला नागरिक, विद्यार्थी, सांस्कृतिक क्षेत्रातील अभ्यासक आणि पर्यटकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे दर्शन घ्यावे, असे आवाहन, सांस्कृतिक कार्य संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे.

पान १ वरून

# 'महाराष्ट्र विकायला...

बाहेर या. मध्यंतरी रिलबाज वगैरे आले होते. गुंतायला होतं त्यात. डान्सबार झाले त्याची लक्षणं आहेत तिथे नोटा उधळणं बंद झालं इथे हे सुरु झालं. तुम्हाला गुंतवून ठेवायचं आणि सरकारला प्रश्न विचारु नयेत यासाठीचं हे डिझाईन आहे. हे फक्त भारतात नाही जगभरात सुरु आहे", असंही राज ठाकरे म्हणाले.

### 'आपण इराणला साथ द्यायला हवी होती', मध्य पूर्वेतील युद्धावर राज ठाकरेंचं भाष्य

राज ठाकरेंनी भाषणाच्या सुरुवातीलाच इराण-इस्रायल युद्धावर भाष्य करत देशावर ओढवलेल्या एलपीजी गॅसच्या टंचाईवर बोट ठेवलं. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूनंतर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी श्रद्धांजली वाहण्यासाठी उशीर केला, असे राज ठाकरे म्हणाले. भाषणाच्या सुरुवातीलाच राज ठाकरे म्हणाले, "देशात आज धाकधूक असून भीषण परिस्थिती आहे. नेहमी नॉर्मलवर असणारे लोक सध्या गॅसवर आहेत. काही गोष्टी आपल्या पंतप्रधानांकडून राहून गेल्या. इराण इतकी वर्षे आपल्याला साथ देत होता. त्या इराणवर ज्या प्रकारचे हल्ले होत आहेत, ते पाहता आपण इराणला साथ द्यायला हवी होती", असं राज ठाकरे म्हणाले.

# शेतकऱ्यांच्या बांधावर...

निवडणुक संदर्भातील कामकाज देखील महसूलकडे असल्याने तालुक्यातील सर्वाधिक कामाचा ताण हा महसूल विभागाकडे येत असतो.

या सर्व धावपळीत काही कामे देखील प्रलंबित राहत असतात परंतु महसूल विभागाने यंदा छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर घेण्याचे निश्चित केल्यामुळे सध्या या शिबिरामध्ये अनेक प्रलंबित प्रश्न तत्काळ व जागेवर सुटू लागले. महाराजस्व समाधान शिबिराचा लाभ घेण्यासाठी महसूल प्रशासनाच्या वतीने करण्यात केल्यामुळे महसूलचे अधिकारी तालुक्यातील आठ मंडळसह ग्रामीण भागातील प्रत्येक गावात दौरे करून शेतकरी,नागरिकांच्या महसूलच्या समस्येच्या निपटारा करण्यासाठी या मेळाव्यात सहभागी व्हावे असे आवाहन करीत असून स्वत तहसीलदार मदन जाधव हे देखील एसी दालनाच्या बाहेर शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन संवाद साधून अडचणीचे निराकरण करत आहेत.

खुद्द तहसीलदार मदन जाधव हे देखील शेतकऱ्यांच्या थेट बांधावर जाऊन त्यांच्याशी चर्चा करून त्यांच्या शेतीविषयक महसूलकडील प्रश्न समजून घेत असल्यामुळे कनिष्ठ पातळीवर सुद्धा काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये या भेटींचा सकारात्मक संदेश गेला असून कामात हयगय व कामचुकारपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर चाप बसला. फक्त कार्यालयात बसून आलेल्या नागरिकांचे आपल्या परीने योग्य ते समाधान करण्यापेक्षा त्याच्याही पुढे जाऊन शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन, त्यांच्या सोबत जेवण करून, त्यांना आपलेसे करून तहसीलदार मदन जाधव हे शेतकऱ्यांच्या मनातील भावना समजून घेत आहेत व त्यांच्याकडून आलेल्या प्रश्नांवर मार्ग काढल्याने शासनाचे सर्व कामकाज लोकाभिमुख करण्याच्या प्रक्रियेमध्ये तहसीलदार मदन जाधव यांच्या पुढाकाराने महसूल विभागाने वाळू वाटप,प्रलंबित प्रश्नाचा निपटारा,रेशन व वयोवृद्ध मानधन प्रकरणास मंजूरी दिल्याने महसूलने आघाडी घेतल्याचे दिसून येत असून त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांत समाधान व्यक्त होत आहे.

> शेतकऱ्यांना त्यांच्या बांधावर जाऊन भेटल्यामुळे मोकळयापणाने बोलतात.शिवाय त्यांच्या भाषेत सहज संवाद साधल्यास त्यांच्या नेमक्या अडचणी समजण्यास मदत होते. त्यामुळे त्यावर उपाययोजना करून शेतकऱ्यांना दिलासा देणे सोपे जाते. यासाठी तहसील कार्यालयाच्या वतीने दर मंगळवारी व गुरुवारी "एक दिवस बळीराजा सोबत" हे अभियान राबवले जात आहे.
> **- मदन जाधव** (तहसीलदार मंगळवेढा)

## वात्रटिका

### कॅप्टन भोंदू

भूलुन जातात लोकं आणि
घ(ख)रात घुसतात बाबा...
किळसवाणी वागले भोंदू
त्यांचे कारनामे तोबातोबा...
जोतिषी म्हणवून स्वतःला
किती तरी लोकांना गंडवले...
शहाण्यांनी देखील बाबाचे
आनंदाने पाद्यपुजन केले...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# अवैध अग्निशस्त्र बाळगणाऱ्या पैलवानास अटक

## 50,200/- रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर ग्रामीण जिल्हयामधील बार्शी तालुका पोलीस ठाणे येथे अवैध अग्निशस्त्राचा वापर करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करण्यात आल्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याअनुषंगाने पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण अतुल कुलकर्णी यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जगताप यांना सोलापूर ग्रामीण जिल्हयामध्ये अवैध अग्निशस्त्र बाळगणाऱ्या इसमांची माहिती काढून कारवाई करणेबाबत आदेश दिले होते.

त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जगताप यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील दुय्यम अधिकारी व अंमलदार यांना अवैध अग्निशस्त्र बाळगणाऱ्या इसमांवर कारवाई करणेबाबत सुचना दिल्या होत्या.

त्याप्रमाणे श्रेणी पोलीस उपनिरीक्षक म. इसाक अबास मुजावर यांचे पथक टेंभूर्णी पोलीस ठाणे गुरनं 145/2026 बीएनएस 304(2) प्रमाणे दाखल गुन्हयाचे समांतर तपासकामी टेंभूर्णी हद्दीतील करमाळा चौक येथे हजर असताना, पथकातील पोहेकॉ/ 853 मोहन शामकर्ण मनसावाले यांना गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मौजे बेंबळे ता. माढा जि. सोलापूर येथील पैलवान नामे अभिषेक उर्फ भैय्या गायकवाड हा टेंभूर्णी शहरातील हॉटेल सागर, परमिट रुम येथे अवैध अग्निशस्त्रासह बसला असून त्याचे अंगावर क्रिम रंगाचा फुलशर्ट व निळया रंगाची जिन्स घातलेली असल्याबाबत खात्रीशीर बातमी मिळाली.

त्यानुसार लागलीच सदरीची बातमी टीम मधील श्रेणी पोलीस उपनिरीक्षक म.इसाक अबास मुजावर यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जगताप यांना कळविली असता, त्यांनी तात्काळ कारवाई करणेबाबत आदेश दिले. त्यांनतर लागलीच दोन पंचासह हॉटेल सागर परमिट रुम येथे जावून बातमी प्रमाणे पाहिले असता, हिरव्या रंगाचे शेडनेट मध्ये बातमीप्रमाणे एक इसम बसलेला दिसला, त्यास ताब्यात घेवून त्याचे नांव पत्ता विचारता त्याने त्याचे नांव अभिषेक उर्फ भैय्या गायकवाड, वय 28 वर्षे, रा. बेंबळे ता. माढा जि. सोलापूर असे असल्याचे सांगितले. त्याचे जवळ जावून त्याची अंगझडती घेतली असता, कंबरेच्या उजव्याबाजूस मॅगझीनसह एक गावठी पिस्टल व मॅगझीनमध्ये एक जिवंत राउन्ड मिळून आले.

त्याप्रमाणे टेंभूर्णी पोलीस ठाणे येथे गुरनं 159/2026 भारतीय हत्यार कायदा 1959 चे कलम 3,7, 25 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास टेंभूर्णी पोलीस ठाणेचे पोलीस उपनिरीक्षक मदने हे करीत आहे. सदर आरोपीस अटक करुन मा. न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने आरोपीस दिनांक 20/03/2026 पर्यंत 02 दिवसाची पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर यांचे मार्गदर्शनाखाली टेंभूर्णी पोलीस ठाणेचे प्रभारी सहा.

पोलीस अधिक्षक आत्राम, स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जगताप यांचे नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे श्रेणी पोलीस उपनिरीक्षक म.इसाक अबास मुजावर, सफौ/ नारायण गोलेकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, अक्षय डोंगरे, संदीप हुलगे, चालक सतिष बुरुकुल यांचे पथकाने कामगिरी बजावली आहे.

# सांगोला तालुक्यात ठिकठिकाणी गारांचा पाऊस



**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** दिवसभराच्या उष्णतेने हैराण झालेल्या नागरिकांना बुधवारी सायंकाळी सातच्या सुमारास गारांच्या पावसाने झोडपले. सांगोला तालुक्यातील जुनोनी, उदनवाडी, झापाचीवाडी, राजुरी, कडलास परिसरात वादळी वारा व विजांच्या कडकडाटात गाराच्या पावसाने झोडपून काढले.

सांगोला तालुक्यात मंगळवारी सायंकाळच्या वेळी जोराचा वादळी वारा व विजांचा कडकडात सुरू झाला होता. घेरडी परिसरात गारांचा पाऊस पडला. बुधवारी दिवसभर उष्णतेचा पारा चढलेला होता. सायंकाळी ७ वाजले पासून जोराचा वादळी वारा, ढगांचा गडगडात व विजांचा कडकडाट सुरू झाला. त्यानंतर लगेचच तालुक्यातील जुनोनी, झापाचीवाडी, उदनवाडी, राजुरी, वाटंबरे, कडलास परिसरात गारांच्या पावसाला सुरुवात झाली. यामध्ये शेतकऱ्यांच्या फळबागांसह गहू,ज्वारी याही पिकांचे नुकसान झाले आहे. मागील दोन दिवसांपासून सांगोला तालुक्यातील विविध भागात वादळी वारा, विजांचा कडकडाट व ढगांचा गडगडाट सुरू असून मंगळवारी घेरडी परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले तर बुधवारी झालेल्या पावसाने जुनोनी, हातीद, उदनवाडी, झापाचीवाडी, राजुरी, वाटंबरे, कडलास, परिसरात झालेल्या गारांच्या पावसामुळे आंबा, द्राक्षे, केळी, फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे.

# सोलापूराकरांसाठी शुक्रवारी मोगरा फुलला सांस्कृतिक कार्यक्रम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंती निमित्त आध्यात्मिक वा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणेत आले आहे. दिनांक २० मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता मोगरा फुलला हा ज्ञानियांचा राजा हा कार्यक्रम सरस्वती विद्या मंदिर प्रशालेच्या प्रांगणात होणार आहे. राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाचे सांस्कृतिक कार्य संचालनालय यांचे वतीने सायंकाळी ६ वाजता या कार्यक्रमाचा शुभारंभ होणार आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांचे प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. प्रसिध्द व्याख्याते व प्रवचनकार गणेश शिंदे व प्रसिध्द गायिका सन्मित्ता शिंदे व त्यांची टीम या कार्यक्रमाचे सादरीकरण करणार आहेत.

या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य असून दत्त चौक येथील सरस्वती विद्या मंदिर प्रशालेचे मैदानावर या कार्यक्रमा साठी उपस्थित रहावे असे आवाहन करणेत आलेले आहे.

# प्रकाश गायकवाड यांनी सापडलेला मोबाईल केला परत



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर अकलूजमध्ये प्रामाणिकतेचे एक प्रेरणादायी उदाहरण समोर आले आहे. अकलूज नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील यांचे स्वीय सहाय्यक प्रकाश गायकवाड यांनी सापडलेला सुमारे ६५ हजार रुपये किमतीचा मोबाईल प्रामाणिकपणे मालकाला परत करून सामाजिक जबाबदारीची जाणीव दाखवली. महर्षी चौक, अकलूज येथील जनसंपर्क कार्यालयासमोर गुढीपाडव्याच्या दिवशी दुपारी सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास प्रकाश गायकवाड आणि 'महर्षि डिजीटल न्यूज चे संपादक सागर खरात कार्यालयाकडे जात असताना रस्त्याच्या कडेला बॉक्स पॅक अवस्थेत एक ओप्पो मोबाईल पडलेला दिसला. त्यांनी तत्काळ तो उचलून पाहिला असता त्यावर 'त्रिमूर्ती मोबाईल' असे लिहिलेले आढळले.

मोबाईलचा मालक शोधण्यासाठी त्यांनी काही वेळ त्या ठिकाणी थांबून प्रतीक्षा केली. मात्र, कोणीही न आल्याने त्यांनी गुगलवर शोध घेऊन सदुभाऊ चौक, अकलूज येथील संबंधित दुकानाशी संपर्क साधला. दुकानातून मिळालेल्या माहितीनुसार संबंधित वितरकाशी संपर्क साधण्यात आला असता मोबाईल हरवल्याची तक्रार पोलिस ठाण्यात नोंदवली असल्याचे समजले. यानंतर जनसंपर्क कार्यालयासमोरील सीसीटीव्ही फुटेज तपासून खातरजमा करण्यात आली. सर्व पडताळणी पूर्ण झाल्यानंतर संबंधित मालकाला मोबाईल परत देण्यात आला.

प्रकाश गायकवाड आणि सागर खरात यांच्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक होत असून, त्यांच्या या कृतीमुळे समाजात सकारात्मक संदेश गेला आहे. यावेळी सचिन नरसाळे व सागर अडगळे उपस्थित होते.

# नवोन्मेष व उद्योजकता विषयक परिसंवादाचे पिंपरी चिंचवड विद्यापीठ मध्ये आयोजन

**पिंपरी, पुणे (कटूसत्य वृत्त):-** पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू), पुणे येथे शुक्रवारी, २० मार्च रोजी 'नवोन्मेष आणि उद्योजकता' या विषयावर एक दिवसीय भव्य परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे.

ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था, स्टार्टअप संस्कृती, संशोधनाचे व्यापारीकरण, इन्क्युबेशन, बौद्धिक संपदा हक्क (आयपीआर), पेटंट्स, डिझाईन आणि उत्पादन विकास यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर या परिसंवादात मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे पद्मश्री डॉ. जी. डी. यादव, माजी कुलगुरू, इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (आयसीटी), मुंबई हे असणार आहेत. त्यांच्या शुभहस्ते पिंपरी चिंचवड विद्यापीठाच्या ह्यसेंटर फॉर इनोव्हेशन अँड आंत्रप्रेन्योरशिपह्न या केंद्राचे उद्घाटन होणार आहे. या केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थी, संशोधक आणि युवा उद्योजकांना स्टार्टअप इन्क्युबेशन, कल्पनेपासून उत्पादन निर्मितीपर्यंत मार्गदर्शन, तंत्रज्ञान हस्तांतरण, उद्योग संलग्न संशोधन तसेच पेटंट आणि व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.





या परिसंवादात पद्मश्री प्रतापराव पवार; डॉ. सुरेश गोसावी, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ; डॉ. एस. एस. मंथा, माजी अध्यक्ष अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद (एआयसीटीइ); डॉ. श्रीकांत पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य नवोन्मेष सोसायटी; डॉ. राजेंद्र जगदाळे, महासंचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे; डॉ. अरविंद शालीग्राम, माजी कुलसचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी इनोव्हेशन सेंटर; तसेच सचिन इटकर, उपाध्यक्ष महाराष्ट्र इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कौन्सिल आदी उपस्थित राहणार आहेत.

या परिसंवादाविषयी अधिक माहिती देताना पीसीयूचे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी सांगितले की, या परिसंवादाचा उद्देश नवोन्मेष, उद्योजकता, संशोधनाचे व्यापारीकरण आणि उद्योग, शैक्षणिक सहकार्य यासाठी सक्षम परिसंस्था निर्माण करणे हा असून विद्यार्थ्यांना आणि युवा उद्योजकांना त्यांच्या कल्पनांचे शाश्वत स्टार्टअप्स व प्रभावी उद्योगांमध्ये रूपांतर करण्यासाठी प्रोत्साहन देणे हा आहे. यामध्ये पीसीयूचे विद्यार्थी स्टार्टअप्सचे अनुभव, नवीन विकसित केलेले प्रकल्प प्रदर्शित करतील. युवा नव उद्योजकांना उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ, गुंतवणूकदार आणि धोरणनिमार्ते यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळणार आहे.

हा परिसंवाद पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, खजिनदार शांताराम गराडे, सचिव विठ्ठल काळभोर, पीसीयू व्यवस्थापन प्रतिनिधी अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शन व पाठबळातून आयोजित केला आहे. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आणि मार्गदर्शनामुळे पीसीयूमध्ये शैक्षणिक उत्कृष्टता आणि सर्वांगीण विकास साध्य करण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू आहे. या परिसंवादात महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी आणि कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा येथील कुलगुरू, बीएचएयू सीओइपी, बीएचएयु इन्स्टिट्यूट सीईओ, रिसर्च पार्क फाउंडेशन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि कर्मवीर भाऊराव पाटील क्लस्टर विद्यापीठ, सातारा येथील मुख्य कार्यकारी अधिकारी आणि कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) चे प्रतिनिधी देखील सहभागी होणार आहेत. त्याचबरोबर वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली; श्री गुरु गोबिंदसिंगजी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, नांदेड; डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी, पुणे; इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च, पुणे; आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी; कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग; डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन; नॅशनल केमिकल लॅबोरेटरी; सेंटर फॉर मटेरियल्स फॉर इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी आणि सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स्ड कम्प्युटिंग (सी डॅक) या संस्थांमधील संचालक व वैज्ञानिकही उपस्थित राहणार आहेत. याशिवाय फोर्ब्स मार्शल, गोदरेज इंडस्ट्रीज, डेलॉइट, विप्रो, पारी, मेरीटाइम रिसर्च सेंटर (एमआरसी) या प्रमुख उद्योगातील सुमारे ४० वरिष्ठ संशोधक, उद्योग प्रतिनिधी आणि व्यावसायिक सहभागी होणार आहेत.प्र–कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, कुलसचिव डॉ. अनिल महेश्वरी आणि संशोधन व विकास संचालक डॉ. भारत काळे, आंतरराष्ट्रीय संबंध विभागाचे संचालक डॉ. शंकर देवसारकर हे संयोजन करत आहेत.

# युवराज काकडे यांच्याकडून सभापती-उपसभापती चषकाची घोषणा



**हवेली (कटूसत्य वृत्त):-** हवेली तालुका प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने हवेली पंचायत समितीचे नवनिर्वाचित सभापती श्री. युवराज हिरामण काकडे, उपसभापती सौ. विद्याताई गायकवाड यांचा सत्कार समारंभ थेऊर येथे पार पडला. हवेली तालुका शिक्षक संघाच्या वतीने सभापती उपसभापती यांना विशेष सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी युवराज काकडे बोलत होते.

याप्रसंगी हवेली तालुका प्राथमिक शिक्षक संघाचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य,महिला आघाडी तसेच तालुक्यातील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी हवेली तालुका प्राथमिक शिक्षक संघाच्या नुतन कार्यकारिणी सदस्यांची घोषणा यावेळी शिक्षक संघाच्यावतीने करण्यात आली. यावेळी सभापती व उपसभापती यांच्याहस्ते नव्या कार्यकारिणी सदस्यांना निवडपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी शिक्षकांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी आणि शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी कायम शिक्षकांच्या पाठीशी राहण्याचे आश्वासन सभापती युवराज काकडे व उपसभापती विद्या गायकवाड यांनी दिले.

हवेली तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांसाठी, जिल्हा परिषदेच्या जिल्हा परिषद अध्यक्ष चषकाच्या' धर्तीवर, तालुका स्थरावरील शाळांना व शिक्षकांना प्रोत्साहन मिळण्यासाठी 'पंचायत समिती सभापती, उपसभापती चषक व शिक्षकसंघ चषक' या चषकांची नव्याने घोषणा यावेळी करण्यात आली.

तालुका स्तरावरील प्रथम क्रमांकाच्या शाळेसाठी सभापती चषक व 25,000 रु पारितोषिक, द्वितीय क्रमांकासाठी उपसभापती चषक व 15,000 रु पारितोषिक, तृतीय क्रमांकासाठी शिक्षक संघ चषक व 10,000 रु पारितोषिक असे बक्षीस देण्यात येणार आहे.

या पुरस्कारांचे वितरण आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटके, जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष या मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात येणार असल्याचे सभापती काकडे यांनी सांगितले.

तसेच तालुक्यातील सर्व शाळांनी यात सहभागी होण्यासाठी, शाळेच्या सर्व शिक्षक बांधवांनी शाळांचा दर्जा व गुणवत्तापूर्ण शिक्षण याकडे प्रामुख्याने भर देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

# पंचायतराज समृद्ध अभियानात सोलापुरातील २५० गावांचा सहभाग

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ग्रामीण भागाचा कायापालट करणाऱ्या 'मुख्यमंत्री पंचायतराज समृद्ध अभियाना'चा शेवटचा टप्पा सुरू झाला असून, सोलापूर जिल्ह्यातील २५० गावांमध्ये प्रथम क्रमांक पटकावण्यासाठी चुरस लागली आहे. ३१ मार्चअखेर अभियानाची मुदत असल्याने गावागावांतील सरपंचांसह सदस्य आणि ग्रामस्थ कामासाठी अधिक हिरिरीने पुढाकार घेत असल्याचे चित्र आहे.

या अभियानाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त जिल्हाधिकारी संदीप कोहिनकर आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ स्वतः गावोगाव भेटी देऊन पाहणी करत आहेत. अनेक गावांमध्ये या अधिकाऱ्यांनी मुक्काम करून ग्रामस्थांशी थेट संवाद साधला आहे. जानेवारी ते मार्च या कालावधीत करवसुली, गावाची स्वच्छता, शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत कार्यालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या बळकटीकरणावर विशेष भर देण्यात आला आहे. जिल्ह्यातील सहभागी २५० गावांतून तालुकास्तरावर प्रत्येकी ५ गावांची निवड केली जाईल.

यात पहिल्या तीन क्रमांकांची गावे आणि २ विशेष गावे अशी एकूण ५५ गावे निवडली जाणार आहेत. या ५५ गावांतून जिल्हास्तरासाठी ३ गावांची निवड होईल आणि हीच गावे पुढे विभाग व राज्यस्तरावरील स्पर्धेसाठी पात्र ठरणार आहेत.

**मोठ्या रकमेची बक्षिसे**

तालुकास्तर : १५ लाख (प्रथम), १२ लाख (द्वितीय), ८ लाख (तृतीय) व विशेष निवडीसाठी ५ लाख रुपये.

जिल्हास्तर : ५० लाख (प्रथम), ३० लाख (द्वितीय) व २० लाख रुपये (तृतीय).

विभागस्तर : १ कोटी (प्रथम), ८० लाख (द्वितीय) व ६० लाख रुपये (तृतीय).

राज्यस्तर : ५ कोटी (प्रथम), ३ कोटी (द्वितीय) व २ कोटी रुपये (तृतीय).


## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय

**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-

**8083608083**
**9922646566**
**8698732109**

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)


### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केन्द्र

**आमच्याकडे सगळया समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**

मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) उमेदवाराचा आश्वासनांचा जाहीरनामा २) दुष्काळात प्रत्येकाला रोजगार मिळण्यासाठी शासन चालवत असलेली योजना-**** ** योजना ३) लाभ, उपयुक्त ४) नशीब (हिंदीत) ५) राहुल गांधी यांच्या बहिणीचे नाव ६) स्त्रियांना कपाळभर लावलेले कुंकू ७) येणाऱ्या काळात ११) गडबड, धांदल १२) भय, भीती (हिंदीत) १३) फटाक्यांची माळ १५) विमान उतरण्याची जागा १८) मुख्याध्यापक २०) हात, टॅक्स २१) बाहेरच्या विरूध्दार्थी २३) दुप्पट (इंग्रजीत) २४) मजबूत, कणखर २५) विचार, निर्धार (हिंदीत) २९) एक जगप्रसिध्द धरण कालवा ३०) सायकलचे चाक ३१) मत देण्याची क्रिया ३२) कामाचा मिळणारा आर्थिक मोबदला ३४) सलमान खानच्या बंधूचे नाव ३५) मराठी चित्रपटसृष्टीतील एक अभिनेता-*** भावे ३८) मनसे अध्यक्ष-** ठाकरे ३९) दु:ख (हिंदीत) ४०) कावळ्याचे ओरडणे **काव ४२) याच्या पिठापासून चपाती अथवा पोळी करतात

**आडवे शब्द :** १) खा. राहुल गांधी यांचे भाजपमध्ये असलेले चुलतबंधू २) आमदार असलेले पवारांचे नातू-*** पवार ५) पंकजा मुंडे यांच्या खासदार असलेल्या बहिणीचे नाव ७) एक हिंदी भाषिक न्यूज चॅनल ८) तीन गुणिले तीन ९) छ. शिवरायांना राज्याभिषेक करणारे धर्मगुरू-** भट्ट १०) गायीचे वासरू १३) छगन भुजबळ यांचे एक पुतणे १४) भारतीय क्रिकेट संघातील एक माजी खेळाडू -** शास्त्री १६) नाला १७) सासरच्या विरूध्दार्थी १९) पाकचा एक माजी फलंदाज-इंझमाम उल ** २१) दंगल चित्रपटातील प्रमुख अभिनेता २२) पुसटच्या विरूध्दार्थी २५) बिल्डिंग (मराठीत) २६) याच्यावर भाकरी भाजतात २७) णब उलट लिहा २८) बरोबर, योग्य २९) वास, गंध ३२) धनी ३३) दरवाजा ३४) उमेदवाराने डिपॉझिट म्हणून भरलेली रक्कम (मराठीत) ३५) मुलाची पत्नी ३६) कपडे धुण्याची प्रसिध्द पावडर ३७) रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ३८) क्रोध, संताप ४०) श्रवणेंद्रिय ४१) मेंढीपालन करणारा समाज, सरकारने यांच्या आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित ठेवला आहे ४३) वस्तूंची एकत्र केलेली जुळवाजुळव ४४) तूप (हिंदीत)

## सुडोकु - 205

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | | | 2 | | 4 |
| | | 7 | 5 | 8 | 6 | 9 | 1 | 3 |
| | 1 | | 3 | | | | | 7 |
| | 3 | | 6 | 5 | | 4 | 7 | 9 |
| | | 8 | 7 | | 3 | | 6 | 2 |
| | | | 2 | | | 5 | | 8 |
| 8 | 7 | | | | | | | |
| | 4 | 9 | | 1 | | | 2 | |
| 2 | 5 | | 4 | | | 8 | 9 | |

# सिंहगड पब्लिक स्कूलमध्ये गुढीपाडवा उत्साहात; विद्यार्थ्यांना परंपरेची ओळख




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंहगड पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये मराठी नववर्षाचा प्रारंभ दर्शविणारा गुढीपाडवा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांना या सणाचे सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्व समजावे, यासाठी शाळेच्या वतीने विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळेस मुख्याध्यापिका शाहीन शेख, उपमुख्याध्यापक प्रकाश नवले, स्मिता नवले यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या प्रांगणात पारंपरिक पद्धतीने गुढी उभारून करण्यात आली. फुलांच्या माळा, कडुलिंबाची पाने, साखरगाठी आणि रेशमी वस्त्रांनी सजविलेल्या गुढीने वातावरणात उत्सवाची रंगत आणली. या प्रसंगी सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव तथा सिंहगड इन्स्टिट्यूट, केगावचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी गुढीपाडव्याचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत समजावून सांगत भारतीय संस्कृतीचे जतन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शेवटी सर्वांना कडुलिंब-गुळाचा प्रसाद वाटप करण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आपल्या सण-परंपरांची माहिती मिळून त्यांच्यात संस्कृतीविषयी आदरभाव निर्माण करण्याचा उद्देश साध्य झाल्याचे शाळा प्रशासनाने सांगितले.

# सीना नदीवरील बंधाऱ्याच्या दुरुस्तीची पृथ्वीराज सावंत यांच्याकडून पाहणी



**माढा (कटूसत्य वृत्त):-** गेल्या काही दिवसांपूर्वी खैराव येथील सीना नदीवरील बंधाऱ्याला दारे नसल्याची बाब काही शेतकऱ्यांनी पृथ्वीराज सावंत यांच्या निदर्शनास आणून दिली. या गंभीर समस्येची त्वरित दखल घेत पाटबंधारे विभागाशी संपर्क साधून तातडीने दुरुस्ती करण्याच्या सूचना पृथ्वीराज सावंत यांनी दिल्या होत्या.

शेतकऱ्यांच्या हिताचे हे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे, यासाठी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला होता. या प्रयत्न ांना यश येऊन बंधाऱ्याच्या कामाला गतीने सुरुवात झाल्याचे सावंत यांनी सांगितले. आज प्रत्यक्ष खैराव येथे जाऊन या कामाची पाहणी केली आणि आढावा घेतला. येणाऱ्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर या बंधाऱ्याचे काम पूर्णत्वास जात असल्याने पाण्याचा मोठा साठा निर्माण होईल.

यामुळे परिसरातील शेतकरी बांधवांचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागण्यास निश्चितच मोठी मदत होणार आहे. निवडणुकीत दिलेल्या शब्दाला जागत बळीराजाच्या सुखासाठी आणि विकासासाठी आपण सदैव कटिबद्ध आहोत कडाक्याच्या उन्हात शेतकऱ्यांन आपल्या घामाने पिकवलेली पिके बंधाऱ्याच्या नादुरूस्तीमुळे सुकून जाणार नाहीत. यासाठी सातत्या पाठपुरावा करून शेतकऱ्यांच्य सेवेसाठी सेवक म्हणून कायम प्रयत्नशील असेन, असे पृथ्वीराज सावंत यांनी सांगितले.

# अखेर पोलीस बंदोबस्तात मराठा समाजाच्या नगरसेवकांचा सत्कार

## माऊली पवार गद्दार निघाल्याने मराठा समाजाने कार्यक्रमाकडे फिरवली पाठ



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत विजय मिळवून जनसेवेची संधी मिळालेल्या सकल मराठा समाजातील नवनिर्वाचित नगरसेवकांचा जाहीर सन्मान व गौरव सोहळा अत्यंत उत्साहात आणि भव्य स्वरूपात संपन्न झाला. समाजातील एकात्मता, आदर आणि सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी उपस्थित राहून नवनिर्वाचित प्रतिनिधींचे कौतुक केले.

**प्रमुख मान्यवरांची उपस्थिती**

या दिमाखदार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सोलापूरचे महापौर विनायकजी कोंड्याल होते. तसेच व्यासपीठावर उपमहापौर देवकर मॅडम, भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शशिकांतजी चव्हाण, सोलापूर शहर भाजप अध्यक्ष चेतनसिंह केदार, ज्येष्ठ संपादक राजा माने साहेब यांच्यासह सकल मराठा समाजातील मान्यवर आणि सर्व नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थित होते.

**समाजाच्या विकासासाठी प्रेरणादायी पाऊल**

कार्यक्रमात बोलताना मान्यवरांनी नवनिर्वाचित नगरसेवकांच्या कार्याचा गौरव केला. मराठा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शहराच्या प्रगतीसाठी या नगरसेवकांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास पालकमंत्र्यांनी व्यक्त केला. हा सोहळा केवळ सन्मान नसून आगामी काळात समाजाच्या हितासाठी अधिक जोमाने काम करण्याची ही एक प्रेरणा असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

**माऊली पवार यांचा पुढाकार**

सकल मराठा समाज प्रबोधन, प्रशिक्षण व संशोधन संस्था, सोलापूर यांच्यावतीने माऊली पवार यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम आयोजित केला होता.

**पोलिसांचा मोठा बंदोबस्त**

राम जाधव यांनी या कार्यक्रमास विरोध दर्शवल्याने सभागृहाच्या परिसरात पोलिसांनी मोठा बंदोबस्त लावला होता.

# सोलापूर महानगरपालिकेत नववर्षाचे पारंपरिक स्वागत



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या कौन्सिल हॉल येथे गुढी पाडव्याच्या निमित्ताने पारंपरिक पद्धतीने गुढी उभारणीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. स्थायी समिती अध्यक्षा सौ. रंजिता चाकोते यांच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात उपमहापौर सौ. ज्ञानेश्वरी ताई देवकर आणि स्थायी समिती अध्यक्षा सौ. रंजिता चाकोते यांच्या हस्ते विधिवत गुढी उभारण्यात आली. गुढी पाडवा हा मराठी नववर्षाचा प्रारंभ मानला जातो. यानिमित्ताने गुढी उभारून नवचैतन्य आणि आनंदाच्या वातावरणात नववर्षाचे स्वागत करण्यात आले.

यावेळी बोलताना उपमहापौर सौ. ज्ञानेश्वरी ताई देवकर यांनी गुढी पाडव्याचे महत्त्व अधोरेखित केले. 'हा सण नवचैतन्य, नवउमेद आणि सकारात्मकतेचा संदेश देणारा आहे. नववर्षात सोलापूर शहराच्या विकासासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे. नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध आहे,' असे त्यांनी सांगितले. तसेच त्यांनी शहरवासीयांना गुढी पाडव्याच्या शुभेच्छा दिल्या.

स्थायी समिती अध्यक्षा सौ. रंजिता चाकोते यांनी आपल्या मनोगतात गुढी पाडव्याचे सांस्कृतिक महत्त्व स्पष्ट केले. 'हा सण परंपरा, संस्कृती आणि एकात्मतेचे प्रतीक आहे. या निमित्ताने समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. महानगरपालिकेच्या माध्यमातून नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असून, शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी सहकार्य करावे,' असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमास महानगरपालिकेतील नगरसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. पारंपरिक पद्धतीने साजऱ्या करण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे कौन्सिल हॉलमध्ये उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले.

# महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या वतीने 'नवतेजस्विनी महोत्सव'

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महिला आर्थिक विकास महामंडळ (मावीम), जिल्हा कार्यालय सोलापूर यांच्या वतीने मावीमच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त तसेच जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दि. २३ ते २५ मार्च २०२६ या कालावधीत यशराज लॉन्स, जुनी मिल कंपाऊंड, मुरारजी पेठ, सोलापूर येथे 'नवतेजस्विनी महोत्सव' या नावाने महिला बचत गटांच्या उत्पादनांचे जिल्हास्तरीय भव्य प्रदर्शन व विक्री मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

या महोत्सवाचे उद्घाटन मा. कुमार आशीर्वाद, जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या शुभहस्ते होणार असून मा. अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक (ग्रामीण) सोलापूर, कुलदीप जंगम, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर, विलास बच्चे, विभागीय अधिकारी, महिला आर्थिक विकास महामंडळ, पुणे विभाग, सिद्धराम माशाळे, विभागीय व्यवसाय सल्लागार माविम, चंद्रशेखर जगताप, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सोलापूर तसेच इतर मान्यवर प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

तीन दिवसीय या महोत्सवामध्ये महिला बचत गटांचा सन्मान समारंभ, शासनाच्या विविध योजनांची माहिती, विविध विषयांवरील चर्चा सत्रे व मार्गदर्शन तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सुमारे ६० ते ७० महिला बचत गटांचे स्टॉल येथे उभारण्यात येणार आहेत.

या प्रदर्शनात महिलांनी तयार केलेली विविध दर्जेदार व घरगुती उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध असतील. यामध्ये घरगुती मसाले, हळद पावडर, पापड, लोणची, शेवया, सांडगे, कुरडया, लाल व काळे तिखट, घाण्याचे तेल, दुग्धजन्य पदार्थ, ज्वारी-बाजरीच्या भाकऱ्या, सोलापुरी शेंगदाणा चटणी, लाडू, चिवडा, विविध धान्ये, हस्तकला साहित्य, कपडे, बॅगा, इमिटेशन ज्वेलरी, सौंदर्य प्रसाधने आदींचा समावेश आहे.

तसेच माविम अंतर्गत स्थापित महिला शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत सेंद्रिय भाजीपाला, फळे, कडधान्ये, ज्वारी, बाजरी, मका, सेंद्रिय गूळ, मध, मोरिंगा पावडर आदी उत्पादनेही विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत. विविध खाद्यपदार्थांचे स्टॉलही या ठिकाणी उभारण्यात येणार आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांनी या प्रदर्शनास मोठ्या संख्येने भेट देऊन ग्रामीण महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांची खरेदी करून त्यांच्या आर्थिक उन्नतीस हातभार लावावा, असे आवाहन मावीमचे जिल्हा समन्वय अधिकारी श्री. एम. एस. पटेल यांनी केले आहे.

# शौर्य पाटीलची नवोदय विद्यालयासाठी निवड



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** तालुक्यातील रूई (जि. सोलापूर) येथील शौर्य इंद्रजीत पाटील याची शैक्षणिक वर्ष २०२६ साठी जवाहर नवोदय विद्यालयात निवड झाली असून, ग्रामीण भागातून मिळवलेल्या या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मल्टी पर्पज आदर्श न्यू इंग्लिश स्कूल, गौडगाव (ता. बार्शी) येथे शिक्षण घेत असलेल्या शौर्यने नवोदय प्रवेश परीक्षेत ९७.५० गुण मिळवत सोलापूर जिल्ह्यात ४१ वा क्रमांक पटकावला आहे. त्याच्या या उल्लेखनीय यशामुळे विद्यालयासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या यशाबद्दल कर्मवीर लोहोकर गुरुजी संस्थेच्या वतीने शौर्यचा व त्याचे वडील सुप्रसिद्ध साहित्यिक इंद्रजीत पाटील तसेच आई सौ. शुभांगी पाटील यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

शौर्यच्या यशामागे झुंजकर मॅडम, चव्हाण व प्रवीण बनकर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच विद्यालयाचे प्राचार्य काकडे, जीवन लोहोकर, संजय भड, जीवराज गरड यांनी त्याचे विशेष कौतुक केले.

संस्थेचे अध्यक्ष विनायकराव गरड, सचिव पंडितराव लोहोकर सर व सदस्य संतोष भड यांनी शौर्य व त्याच्या पालकांचा सन्मान केला. याशिवाय माधवराव कुतवळ, जनसेवक अमोल कुतवळ, चंद्रकांत पाटील, रावसाहेब पाटील, भागवत उकिरंडे व अमोल देशमुख यांनीही शौर्यचे अभिनंदन करत त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# दुर्गंधीचा विळखा आणि कचऱ्याचे ढीग!

## सोलापूर शहरात आरोग्याचा प्रश्न गंभीर; नागरिक त्रस्त



**सोलापूर:-** शहरातील घनकचरा व्यवस्थापन कुचकामी ठरल्याने कचरा आणि दुर्गंधीची मोठी समस्या निर्माण झाली आहे. रोज सुमारे ४२० टन कचरा निर्मिती होत असताना, सुमारे २० टक्के कचरा (सुमारे ७०-८० टन) गोळा न होता शहरात, रस्त्यांवर व मोकळ्या जागेत साचून राहतो.

घंटागाड्यांची अनियमितता, खासगीकरणानंतरची खराब कामगिरी आणि कचरा डेपोतील आगींमुळे नागरिक त्रस्त आहेत.

दररोज सुमारे ४२० मेट्रिक टन कचऱ्यापैकी केवळ ३५० टन कचरा गोळा केला जातो, तर उर्वरित कचरा शहरातच पडून राहतो. घरोघरी कचरा गोळा करणाऱ्या गाड्या नियमित येत नसल्याने नागरिक कचरा रस्त्यावरफेकत आहेत. कचरा प्रक्रिया प्रकल्पाची क्षमता कमी पडत असून, कचऱ्याचे ढीग साचत आहेत. दुर्गंधी आणि कचऱ्यामुळे साथीचे रोग पसरण्याचा धोका वाढला आहे. महापालिकेने खासगीकरण केले असले तरी, प्रभावी अंमलबजावणीच्या अभावामुळे समस्येत वाढ झाली आहे.

नागरिकांनी ओला आणि सुका कचरा वेगळा करून घंटागाडीत टाकल्यास ही समस्या कमी होऊ शकते. कचरा वेळेवर उचलला जात नसल्याने शहराच्या उपनगरीय भागात कचऱ्याचे ढीग साचून आरोग्याचा प्रश्न गंभीर होत असल्याच्या तक्रारी नागरिक करत आहेत. काही भागांत घंटागाड्या नियमित येत नसल्यामुळे कचरा उघड्यावर टाकला जातो,

**शहरातील दुर्गंधी कमी करण्याचा प्रयत्न**

घंटागाड्यातील कचरा रस्त्यावर येऊ नये, याची काळजी घेण्याची सूचना वारंवार दिली जाते. कचरा संकलन केंद्रातील दुर्गंधीबाबत आलेल्या तक्रारींची माहिती घेऊ. दुर्गंधी वर उपाय केले जातील. रूपाभवानी मंदिर परिसरात संकलन केंद्र बंदिस्त करण्याचे काम सुरू आहे, असे मनपा प्रशासनाचे म्हणणे आहे. दुर्गंधी आणि प्रदूषण कमी करण्यासाठी महापालिका आयुक्तांच्या संकल्पनेतून १ फेब्रुवारीपासून दुपारच्या सत्रातही कचरा उचलण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे. दुपारी २ ते रात्री १० वाजेपर्यंत कचरा संकलन करून शहरातील दुर्गंधी कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. ज्यामुळे पावसाळ्यात किंवा उन्हाळ्यात दुर्गंधीचे प्रमाण अधिक वाढते. रूपाभवानी मंदिर चौकात येणाऱ्या घंटागाड्यातील कचरा अनेकदा रस्त्यावर पडलेला असतो. कचरा संकलन केंद्रातून दुर्गंधी येते. पॉलिटेक्निकमध्ये येणाऱ्या मुलींना या दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागतो. दुर्गंधी येऊ नये म्हणून सातत्याने रासायनिक प्रक्रिया करायली हवी. अन्यथा हा डेपो इतरत्र स्थलांतरित करावा, अशी नागरिकांची मागणी आहे. जुळे सोलापूर पाणी टाकी येथील कचरा संकलन केंद्रातील दुर्गंधीचा त्रास परिसरातील नागरिकांना सातत्याने होतो. पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या संकलन केंद्रांना महिन्यातून एकदा भेट दिली पाहिजे.

# गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार २.० मुळे राज्यात जलसाठा क्षमतेत वाढ

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील जलसुरक्षा बळकट करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार उपक्रमाला राज्यभरात प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. या योजनेमुळे हजारो जलसाठ्यांची क्षमता वाढली आहे. योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात म्हणजे गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार २.० अंतर्गत मोठ्या प्रमाणावर गाळ उपसा करून शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळत आहे. राज्यातील ३४ जिल्ह्यांमधील सुमारे ३,२६८ जलसाठ्यांमधून आतापर्यंत ७.७३ कोटी घनमीटर इतका गाळ काढण्यात आला आहे. त्यामुळे ७७ लाख पाण्याच्या टँकर इतकी जलसाठवण क्षमता पुनर्संचयित झाली असून ११ हजार ५८३ गावांतील सुमारे १ कोटी ३९ लाख नागरिकांना त्याचा लाभ झाला आहे. सुमारे ६९ हजार शेतकऱ्यांनी गाळ आपल्या शेतात नेला, त्यापैकी ९१ टक्के शेतकरी वंचित घटकांतील आहेत. २०२५-२६ या आर्थिक वर्षात योजनेला अधिक गती मिळाली असून १,३९८ जलसाठ्यांमधून २.६९ कोटी घनमीटर गाळ काढण्यात आला आहे. यामुळे जवळपास २६ हजार शेतकऱ्यांना फायदा झाला. भंडारा आणि जळगाव जिल्ह्यांत अनुक्रमे ३२ लाख आणि १६ लाख घनमीटर गाळ मंजूर करण्यात आला असून मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे ३०० टक्के वाढ झाली आहे. तसेच गोंदिया आणि गडचिरोलीसारख्या आदिवासी जिल्ह्यांतही योजनेच्या कामांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. राज्यभरातील ४०० पेक्षा अधिक स्वयंसेवी संस्था, ग्रामपंचायती आणि स्थानिक समुदायाच्या सहभागातून ही योजना राबविण्यात येत असून जलसाठे पुनरुज्जीवित करण्यास मदत होत आहे. राज्यातील बहुतांश शेती पावसावर अवलंबून असल्याने जलसाठा वाढविणे आणि भूजल पुनर्भरण मजबूत करण्यासाठी ही योजना अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. संभाव्य एल-निनोच्या पार्श्वभूमीवर जलसुरक्षा बळकट करण्यासाठी या उपक्रमाची अंमलबजावणी शासनाकडून पुढेही सुरू ठेवण्यात येणार आहे.

# बालाजी अमाईन्स च्या सी एस आर फंडातून स्वच्छतागृहाच्या बांधकामाचे भूमीपूजन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बालाजी अमाईम्स कंपनीच्यावतीने बीबीदारफळ येथिल जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत स्वच्छतागृहाच्या बांधकामाचे भुमीपुजन आज बालाजी अमाईन्स कंपनीचे जनरल मॅनेजर गोविंद मेंचेकरे यांच्या हास्ते करण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बीबी दारफळ शाळेतील शिक्षक व पालकसमिती सदस्यांनी बालाजी अमाईन्स कंपनीच्या संचालक मंडळा कडे शाळेत स्वच्छतागृहाची व भोजनकक्षाची मागणी केली याचा बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक राम रेडडी यांनी व सर्व संचालक मंडळानी शाळेत एक स्वच्छतागृहाचे युनिट बांधकामास मंजुरी दिली.

या कार्यक्रमास कंपनीचे डी. जी. एम विनय दुर्गम व सीएसआर प्रमुख अनिल विपत, लक्ष्मण अडसूळ यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापिका श्रीधर साखरे यांच्या हस्ते सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मुख्याध्यापकांनी बालाजी अमाईन्सच्या सर्व संचालक मंडळाचे व व्यवस्थापकीय संचालक राम रेडडी यांचे आभार मानले. या कार्यक्रमास शाळा २ च्या मुख्याध्यापिका वनिता गवळी तसेच शालेय समिती अध्यक्ष सोमनाथ घोंगडे युवा प्रतिष्ठान चे शैलेश साठे तसेच बालाजी अमाईन्स चे सचिन मोरे, प्रसाद सांजेकर, अमोल गुंड, बसवराज अंटद, वसंत साठे महाराज तसेच सर्व शिक्षक व पालक गावातील नागरीक उपस्थित होते.


पाहिजेत

दैनिक सोलापूर कटूसत्य www.katusatya.in
सोलापूर वृत्तदर्पण न्यूज चॅनल

सोलापूर वृत्तदर्पण व दैनिक कटूसत्य या माध्यमांच्या वतीने एक अभिनव व अनोखी योजणा राबविण्याचा संकल्प आहे. त्यासाठी सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागात व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कायम पगारावर खालील पदे भरावयाची आहेत. या करीता सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभाग, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा या तालुका परीसरात एक प्रतिनिधी नेमणे आहेत. ही योजणा यशस्वी करण्यासाठी खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | लिंग | पगार/मानधन व कमिशन (मासिक) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | व्यवस्थापक | २ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | १५००० ते २०००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| २) | सहाय्यक व्यवस्थापक | ४ | एम. बी.ए / पदवीधर | स्त्री/पु | १०००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| ३) | सह संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ४) | उप संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ५) | पत्रकार / वार्ताहर | २५ | १२ वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ६) | कॅमेरामन | २५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ७) | मार्केटींग प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ८) | जाहिरात प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ९) | प्रशिक्षण अधिकारी | १ | एम. बी.ए. / पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| १०) | वसूली प्रतिनिधी | ५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |

नियम व अटी :- १) इच्छूक उमेदवारांनी आपल्या स्वहस्ताक्षरात संपूर्ण माहिती असलेला अर्ज भरुन, त्या सोबत शाळेचा दाखला, मार्कलिस्ट, भारतीय असल्याचा पुरावा, दोन फोटो जोडून, खालील पत्यावर १५ दिवसाच्या आत आणून द्यावे. २) वयोमर्यादा १८ वर्ष पूर्ण ते ४५ वर्षापर्यंत, एक उमेदवार दोन पदासाठी अर्ज करु शकतो. ३) सर्व अधिकार वृत्तदर्पण कडे राखीव राहतील आणि ते अर्जदारांवर बंधनकारक राहतील. वृत्तदर्पण चा निर्णय अंतिम राहील. ४) सदरच्या नियुक्त्या केवळ मुलाखती घेवूनच केल्या जातील. आमच्या व आपल्या वेळेनुसार मुलाखत घेतली जाईल. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी. ५) अर्ज स्वीकारण्याची वेळ रविवार सोडून सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत. ६) मुलाखतीनंतर निवड झालेल्या सर्व उमेदवारांना मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ७) स्वतःचे वहान असणाऱ्यास प्राधान्य.

फोन : 0217-2605091 मो.9657069069

संपर्क :- वृत्तदर्पण कार्यालय, एफ-३, वृंदावन पार्क, चेतन फौन्ड्रीसमोर, होटगी रोड, सोलापूर-३.